# **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी**

लेखाशाखा विभाग

## दरपत्रक सुचना

१. कामाचे नाव : संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने चांदी वस्तु कस लावून तपासणे व बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी तीन सोने-चांदी मुंल्याकनकारांची मासिक मानधनावर नेमणुक करणेसाठी स्थानीक मुल्यांकनकारांकडुन दर पत्रके मागविणेबाबत.

२.

१. आपली नेमणुक दि.०१/१०/२०२० ते दि.३०/०९/२०२२ या दोन वर्षाचे कालावधी करीता राहील.

२. सदरील मुदतीनतंर आपली नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. मुदत संपलेनंतर रद्द केलेचे वेगळे पत्र देण्यात येणार नाही.

३. याकामी आपणास पुढील नेमणुकीकरीता हक्क सांगता येणार नाही.

४. आपली नेमणुक ही मासिक एकत्रित मानधनावर करण्यात येत असुन, या कालावधीत आपणास निश्चित झालेले मासिक मानधन देण्यात येईल.

५. देय मानधनातुन प्रचलित नियमानुसार कर कपात करण्यात येतील.

६. आपणास संस्थान ज्या ज्या वेळी बोलावील त्या त्या वेळी (अर्धा तासाचे आत) सोने-चांदी वस्तु तपासणीकामी संस्थान कार्यालयात येणे बंधंनकारक राहील.

७. दक्षिणापेटया मोजणीच्या वेळी सोने-चांदी वस्तु तपासणीकामी (दरमहा साधारणणे ९ वेळेस दक्षिणा पेटया माजणी असते) दक्षिणा पेटी मोजणी हॉलमध्ये सकाळी ८.३०वा. उपस्थित राहणे बंधंनकारक राहील. याबाबत आपणास पुर्व सुचना देण्यात येईल. याकामी अ.नं. ४ खेरीज कोणतेही जादा मानधन/भत्ता देण्यात येणार नाही.

८. आपणास प्रवास खर्च स्वत: करावयाचा आहे अ.नं. ४ खेरीज कोणतेही जादा मानधन/भत्ता देण्यात येणार नाही.

९. आपण तपासणी केलेल्या वस्तुची शुध्दता, वजन, बाजारभावाप्रमाणे किंमत याबाबतचे प्रमाणपत्र आपले सही शिक्यानिशी द्यावे लागेल.

१०. आपण तपासणी केलेल्या वस्तु बाबत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याकामी आपणास न्यायालयात उपस्थित राहणे बंधंनकारक राहील.

११. आपणास दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी संस्थानने दिलेला गणवेश परीधान करणे बंधंनकारक राहील.

१२. आपणास शासन मान्यताप्राप्त मुल्यांकनकार असल्याबाबतचे प्रमाणपत्र व ज्वेलर्स शॉप ॲक्ट प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

१३. दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी चहा व अल्पोपहार संस्थानमार्फत विनामुल्य देण्यात येईल.

१४. स्थानिक मुल्यांकनकारास प्राधान्य देण्यात यईल.

**१५. कामाची व्याप्ती :-**

मागील तीन वर्षात देणगी रुपाने प्राप्त झालेल्या सोने व चांदी वस्तुंचा तपशिल पुढीलप्रमाणे. :-

| **अ.नं.** | **वर्ष** | **सोने वजन** | | | **चांदी वजन** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो | ग्रॅम | मिली ग्रॅम | किलो | ग्रॅम | मिली ग्रॅम |
| ०१ | २०१६-१७ | २६ | ७९८ | ७१० | ३,९४ | ६५६ | ६४० |
| ०२ | २०१७-१८ | ३९ | २६७ | ७३० | ४,०० | ४०६ | ४२० |
| ०३ | २०१८-१९ | २४ | ७९५ | १५० | ४,२८ | ५५५ | ४६० |
| | **एकुण** | **९०** | **८६१** | **५९०** | **१२,२३** | **६१८** | **५२०** |

उपरोक्त अटी-शर्ती आपणास मान्य असल्यास आपले मासिक मानधन दर (सर्व करांसह) सोबतच्या नमुन्याप्रमाणे नमूद करुन बंद पाकीटात संस्थानचे आवक विभागाकडे दि.३०.०५.२०२० अखेर सायं. ०५.०० वा. पर्यंत सादर करावेत. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८७४४, २५८७२७

संस्थान व्यवस्थापनाने कोणतीही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार राखुन ठेवला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

दि.      /      /२०२०

**प्रति,**
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# दरपत्रक

**कामाचे नांव :- संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तु कस लावून तपासणे व बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करुन त्याचे प्रमाणपत्र देणे.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तू कस लावून तपासणे व बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणे कामाची दरपत्रक सूचना मी वाचली आहे. मी मुल्यांकनासाठीचे माझे दरमहा मानधन खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | दरमहा मानधन रु. (सर्व करांसह) |
|---|---|---|
| १) | संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तु कस लावून तपासणे व बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणे | |

**फर्मचे नांव**
**सही व शिक्का**